MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. II, Issue- LII, 29 March 2022

# ECONOMY



- Editor -

**Mrs. Pallavi Laxman Shete**

**Address for Correspondence**
*Mrs. Pallavi Laxman Shete*
Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com
*Dr. Rajesh G. Umbarkar*
House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

Quarterly Research Journal

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical-Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol. II ISSUE – LII Year – 7 29 March 2022

# Indian Economy : Opportunities and Challenges in 21st Centure

:: Editor ::

**Dr. M. V. Hiray**

:: Co - Editor ::

**Dr. D. N. Sonawane**

**Dr. B. M. Sonawane**

Address for Correspondence

**Mrs. Pallavi Laxman Shete**

Principal, Sanskrti Public School, Nanded (MH India)

**Website: www.wiidrj.com**

House No.624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India - Maharashtra) **Email:** Shrishprakashan2009@gmil.com umbarkar.rajesh@yahoo.com

**Dr. Rajesh G. Umbarkar Mob. No: +91-9623979067**

| | | | |
|---|---|---|---|
| 74 | भारतातील बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र सिंहावलोकन | पृथ्वीराज रत्नाकर शेनार | 320 |
| 75 | विपणन ही एक आर्थिक प्रक्रिया | हेमंत सुधीर खोंडे | 323 |
| 76 | कृषी क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचे योगदान | प्रफुल्ल मन्साराम अहिरे | 326 |
| 77 | कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान विकास | सुखदेव पांडुरंग नागरे | 332 |
| 78 | भारतीय अर्थव्यवस्थेवर COVID-19 चा परिणाम | अक्षय समाधान कदम | 336 |
| 79 | महिला सबलीकरण : एकविसावे शतक | प्रा. डॉ मीनाक्षी पुंडलिक पाटील | 343 |
| 80 | कृषी विपणन | बुद्धप्रिया संजय यशोद | 348 |
| 81 | 'जल प्रदूषणावर उपाय सुचवणे' | आरती प्रकाश वारुळे | 361 |
| 82 | ऑनलाईन शिक्षण अँड डिजिटल इंडिया | डॉ. दिपक वसंत चव्हाण | 363 |
| 83. | महिला सबलीकरण एक प्रेरणादायी उदबोधन | प्रा. एल के पवार | 366 |
| 84. | डिजिटल शिक्षण | संतोष रामराव डवरे | 370 |
| 85. | "भारतीय अर्थव्यवस्थेतील ग्रामीण विपणनातील समस्या आणि आव्हाने" | प्रा. रामदास त्र्यंबक तुपलोंढे | 372 |
| 86. | भाववाद एक चिकित्सक अध्ययन | Dr. Sunita B. Ahire | 377 |
| 87. | महात्मा ज्योतीराव फुले यांचे सामाजिक योगदान ✓ | प्रा. जे. आर. भावसार | 387 |
| 88. | 21 वीं शती में आदमी की खोज़ (डॉ.गिरिराजशरण अग्रवाल के 'आदमी है कहाँ ?' के विशेष संदर्भ है) | डॉ.राजाराम शेवाळे | 389 |
| 89. | समाज सुधारक राजा राममोहन रॉय यांच्या विचारांची प्रासंगिकता ✓ | प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी | 393 |
| 90. | ग्रामीण विकासाचा सुधारित केंद्रीय दृष्टीकोन | प्रा. डॉ. पी. टी. निकम | 396 |
| 91. | جدید تکنیکی ذریعۂ تعلیم اور اردو | Dr. Siddiqui Shaheena Parwin Md. Ilyas | 403 |
| 92. | پرنٹ اور ڈیجیٹل میڈیا میں روزگار کے مواقع | پروفیسر سعدیہ پروین نہال احمد | 408 |
| 93. | ڈیجیٹل تعلیم :مواقع،خطرات اور چیلنجر | Miss.Shaziya Nausheen Jaleel Ahmed. | 412 |
| 94. | गरिबी आणि बेरोजगारी | अहिरे साक्षी किशोर | 417 |
| 95. | डिजिटल एज्युकेशन इंडिया | अर्पना सुरेंद्र येवले | 420 |
| 96. | पंचायतराज आणि महिला ..... | संतोष रामराव डवरे | 422 |

# समाज सुधारक राजा राममोहन रॉय यांच्या विचारांची प्रासंगिकता

प्रा. श्री. आर. के. सुर्यवंशी

इतिहास विभाग, एस.पी.एच कला विज्ञान व वाणिज्य, महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प, ता मालेगांव, जि नाशिक

## प्रस्तावना –

१९ वे शतक धार्मिक, सामाजिक सुधारणा चळवळीसाठी महत्वाचे मानले जाते. या काळातील प्रबोधनामुळे आजही या चळवळीचे विचार प्रेरणादाक असे ठरतात. भारतात धर्मिक सामाजिक सुधारणा चळवळीचा पाया घालणारे राजा राममोहन रॉय हे पहिले होते. म्हणूनच त्यांचा आधुनिक भारताचे जनक किंवा प्रबोधनाचे जनक असा उल्लेख केला जातो. खऱ्या अर्थाने त्यांच्याच काळापासून सामाजिक व धार्मिक चळवळींना प्रारंभ झाला. १९ व्या शतकाच्या पुर्वार्धात इंग्रज सत्तेने हिंदुस्थान आपल्या वर्चस्वाखाली आणला. ज्या देशावर इंग्रजांना राज्य करायचे होते तो देश म्हणजे हिंदुस्थान. या देशाला इंग्रज सरकार मागासलेला व रानटी समजत होते. अशा मागासलेल्या समाजात आपल्या संस्कृतीचा व धर्माचा प्रसार व्हावा असे धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीच्या नेत्यांना वाटत होते.

## हिंदी समाजाची अधोगती –

१९ व्या शतकात इंग्रजांनी मोठा प्रदेश आपल्या सत्तेखाली आणला होता. जे काही राज्यकर्ते आपली राज्ये सांभाळून होते तेही इंग्रज सत्तेच्या आहारी गेले होते. भारतीय समाज मध्ययुगीन काळातच वावरत होता.(१) सती पध्दत, बालिका बळी, विधवा विवाह, केशवपण, अशा दुष्ट चालीरीती समाजात स्विकारल्या जात होत्या. विधवा स्त्रियांचे जीवन दुःखाने भरलेले होते. वेद व उपनिषधे याचे तत्वज्ञान मागे पडले होते. त्याची जागा पुराणातील भाकडे कथांनी घेतली होती. अनेक देवदेवता, पुजा–अर्जा व त्यात दिले जाणारे बळी, जातीभेद, अज्ञान व अंधश्रध्दा या सर्वांच्या जाळ्यात भारतीय समाज सापडला होता. सामाजिकदृष्टया हिंदी समाज अधोगतीला पोहोचला होता. अशा अंधश्रध्दाळू व अज्ञानी समाजामध्ये नव्या युगाचे चैतन्य निर्माण करण्याचे पहिले कार्य राजा राममोहन रॉय यांनी केले.

## ब्राम्हो समाजाची स्थापना :

१९ व्या शतकात भारतात समाज प्रबोधानाची प्रक्रिया सुरू झाली. धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी तरूण वर्ग पुढे सरसावला. त्यासाठी त्यांनी धार्मिक संस्था व सामाजिक संस्थांची स्थापना केली. त्यापैकीच एक संप्रदाय म्हणजे ब्राम्हो समाज होतो या समाजाची स्थापना राजा राममोहन रॉय यानी केली. रॉय यांनी १८१५ मध्ये आत्मीय सभा नावाची संघटना स्थापन केली. इ.स. १८२२ मध्ये युनिटेरियन नावाची संघटना स्थापन केली. या दोन्ही संघटनांचे एकीकरण करून दि. २०/०८/१८२८ रोजी ब्राम्हो समाजाची स्थापना केली.(२) ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून राजा राममोहन रॉय यांनी समाज सुधारण्याचे बहुमोल कार्य केले. रॉय यांनी वेद व उपनिषदांवर प्रवचने दिली. त्या सुमारास खिस्ती मिशनऱ्यांचे हिंदु धर्मावर प्रखर हल्ले होत होते. अशा वेळी हिंदी समाजाने बुरसटलेल्या धर्म कल्पना फेकून दिल्या पाहिजेत असे रॉय यांना वाटत असे. पुढे आपल्या मताच्या प्रचारासाठी त्यांनी इ.स. १८२८ मध्ये सर्व विश्वाचा निर्माता असा एकच परमेश्वर मानणारा मूर्ती पुजेवर विश्वास न ठेवणारा व प्रेम, बंधुत्व व मानवतावाद यांची शिकवण देणारा ब्राम्हो समाज स्थापन केला.

## ब्राम्हो समाजाचे तत्वज्ञान :

रॉय यांनी ब्राम्हो समाजाचे जे तत्वज्ञान मांडले ते आजच्या समाजाला देखील उपयोगी पडणारे आहे. आजही समाजात अनेक देव–देवता आहेत, बोकड बळी दिले जात आहेत. त्यावर रॉय म्हणतात की, परमेश्वर एकच आहे. ईश्वर हा एकच आहे. तो सर्वव्यापी आणि विश्वाचा निर्माता आहे. ब्राम्हो समाजाचा मूर्तीपुजेवर विश्वास नसून तो विश्वबंधुतत्वावर श्रध्दा ठेवणारा आहे. देवाची भक्ती केवळ प्रार्थनेद्वारे केली जाऊ शकते. त्यासाठी दलालाची गरज नाही. सर्व जाती व धर्म समान आहेत. याचाच अर्थ ब्राम्हो समाजाला जाती व्यवस्था मान्य नव्हती. देवाची भक्ती करण्याचा अधिकार सर्वांना आहे. याचाच अर्थ ब्राम्हो समाजाला परमेश्वर भक्तीसाठी

[illegible] अशा संकल्पना मान्य नव्हत्या . ब्राम्हो समाज उपनिषदातील सर्व धर्म सत्यज्ञानावरूनच आहेत व्याख्याने हिंदु समाजाच्या प्रगतीसाठी हिंदू लोकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारण्याची गरज नव्हती. रॉय यांनी एकाच ईश्वराच्या चिंतनास प्राधान्य दिले होते. ब्राम्हो समाजामार्फत उपनिषदातील आत्मा व ब्रम्ह यातील संबंध सामान्य जनतेला पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. समाज सुधारण्याच्या कार्यात ब्राम्हो समाजाने मोलाची भर घातली आहे.

रॉय यांच्या समाज सुधारणा :

रॉय यांनी धर्म सुधारणा एका अर्थाने समाज सुधारणाच होती. त्या काळात धर्म हा समाजाचा आत्मा समजला जात होता. रॉय यांनी सर्व धर्मांचा अीयास क`ला होता. प्रेम, दया, बंधुभाव, परमेश्वराचे श्रेष्ठतव या गोष्टी सर्व धर्मात सारख्याच असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हिंदू धर्माच्या प्रगतीसाठी ख्रिश्चन धर्म स्विकारण्याची गरज नाही. अस्तीत्वात असलेल्या अंधश्रध्दा व मूर्ख रूढी यांचा त्याग करून वेदांचे आचरण करावे. त्यामुळे समाजातील मरगळ नष्ट होऊन समाजाला वैभव प्राप्त होईल असे रॉय यांना वाटत होते. कारण या दरम्यान हिंदू समाज अनेक जाती पंथात अडकला होता. हिंदू समाजाने आपली प्रगती करून घेण्यासाठी जुनाट बंधणे टाकून दिली पाहिजेत असे रॉय यांना वाटत होते.

राष्ट्रापेक्षा व्यक्तीला जात महत्वाची वाटते तेव्हा समाजातील जाती प्रथा व कालबाहय रूढी परंपरा यांचे रॉय यांनी उच्चाटन केले. समाजातील सर्व जाती भेदाच्या भिंती उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक समानतेच्या तत्वावर आधारलेली अत्याधुनिक अशी नविन विषमता विरहीत समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सर्व समाजाचे हित साधले जाईल. मानवी सुखी होईल अशी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. (४)

भौतिकदृष्टया अत्यंत प्रगत असलेल्या इंग्रजांनी आपल्या देशावर केलेले जे आक्रमण आहे त्या आक्रमणाचे खरे स्वरूप रॉय यांना समजले होते. इंग्रजांचे आव्हान हिंदी समाजाला स्विकारायचे असेल तर त्यांनी प्रथम ज्ञानाची साधणे हस्तगत केली पाहिजेत असे रॉय यांना वाटत होते. या विचारातूनच त्यांनी कलकत्ता येथे हिंदू कॉलेज व इंग्रजी शिक्षण देणारे विद्यालय स्थापन केले.

स्त्रियांच्या हक्कांचा कैवारी :

हिंदुस्थानातील स्त्रि दास्य विमोचनाची पहिली चळवळ उभारणारे रॉय हेच होते. त्यावेळी बालविवाही, विधवा विवाह, केशवपण, सतीची चाल यासारख्या अनिष्ठ प्रथा समाजात रूढ होत्या. या अनिष्ठ प्रथेविरूध्द झगडण्याचा प्रयत्न रॉय यांनी केला. हे काम तसे अवघड होते. कारण भट भिक्षुकांचा समाजावर फार मोठा पगडा होता. पती निधनानंतर विधवा स्त्रीने सती जाणे हा धर्म मानला जात होता. रॉय यांनी या धार्मिक प्रथे विरूध्द चळवळ सुरू केली. सरकार दरबारी अर्ज केले. त्याच्या या प्रयत्नामुळे सन १८२९ मध्ये ग. ज. लॉर्ड विल्यम बेटींग यांना सती बंदीचा कायदा करावा लागला व तो अंमलात देखील आणावा लागला. याशिवाय स्त्रियांच्या वारसा हक्कासंबंधी चळवळ देखील रॉय यांनी सुरू केली. समाजातील बहु पत्नीत्वाची चाल बंद व्हावी य ासाठी त्यांनी आपली लेखणी चालवली (५) १९ व्या शतकाच्या सुरूवातीला हिंदी समाज अनेक जाती व पंथ यांच्या बंधणात अडकला होता. हिंदी समाजाला आपली प्रगती करून घ्यावयाची असेल तर त्यांनी जाती भेदाचे जोखड झुगारूण दिले पाहिजे. समाजातील जाती भेद राष्ट्र विकासाला अडसर आहे असे त्यांचे ठाम मत होते. त्यांनी आपल्या लिखानाद्वारे जनजागृती सुरू केली होती. आपल्या हिंदी बांधवांनी जाती बंधनाची व्यवस्था बदलून नव्या युगाचा स्विकार करण्यातच खरे हित आहे. हा त्यांनी दिलेला संदेश त्याकाळी तरी क्रांतीकारकच होता.

राजा राममोहन रॉय हे खरे समाजवादी होते. समाजातील रंजल्या गांजल्यांची सेवा म्हणजे ईश्वर सेवा म्हणजेच ईश्वर पूजा यावर त्यांची श्रध्दा होती. म्हणून त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजातील विधवांवर होणाऱ्या अत्याचाराविरूध्द व सती सारख्या चाली विरूध्द घालवले. ते मानवी स्वातंत्र्याचे भोक्ते होते. रॉय यांच्या ठिकाणी असणाऱ्या श्रेष्ठ मानवतावादी गुणांमुळे इंग्लंड, फ्रान्स मधील विचारवंतानी व राजे रजवाड्यांनी त्यांचा गौरव केला.

सारांश

समाज सुधारणा चळवळीच्या समांतर अशी चळवळ हिंदुस्थानात जोमाने सुरू झाली ती म्हणजे धर्म सुधारणा चळवळ. एका अर्थाने ती समाज सुधारणा चळवळच होती. समाजातील अनेक प्रथांविरूद्ध मुक्तता करणाऱ्या महान सुधारकांपैकी राजा राममोहन राय हे पहिले होते. सतीच्या दुष्ट चालीविरूद्ध त्यांनीच आवाज उठवला. त्यांच्या नंतर बंगाल प्रांतात नव्हे तर संपूर्ण देशभर समाज सुधारकांची मालिकाच सुरू झाली. महाराष्ट्रात लोकहितवादी म. फुले, डॉ. भाऊ दाजी लाड, विष्णुशास्त्री पंडीत, दादोबा पांडुरंग, जगन्नाथ शंकरशेठ, न्या. रानडे, आगरकर, छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, महर्षी शिंदे, असे अनेक समाजसुधारक उदयास आले.

वरील सर्वच विचारवंतांचे विचार आजही प्रेरणा देणारे आहेत. आजही समाजात अनेक देव–देवता, जाती भेद आहेत, बोकड बळी देणे, नवस करणे, गाजर आले जाणे यासारख्या प्रथा समाजात आजही टिकून आहेत. समाज अनेक रूढी–परंपरांनी जखडला गेला आहे. म्हणून इ. स. १९ व्या शतकात विचारवंतानी मांडलेल्या विचारांची गरज आजही वाटते आहे. म्हणूनच प्रस्तुत लेखात मी ''राजा राममोहन रॉय यांच्या विचाराशी प्रासंगिकता'' हा विषय निवडला आहे.

## संदर्भ सूची –

१) डॉ. जयसिंगराव पवार– आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, विद्या प्रकाश पुणे, पृष्ठ –२४१
२) प्रा. गफुर शेख –आधुनिक भारताचा इतिहास, प्रिन्म पब्लीकेशन जळगांव २००५ पृष्ठ ११२
३) पवार, भामरे, शहा – आधुनिक भारताचा इतिहास, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव २०१४ पृष्ठ ७०
४) घाटगे, सोनवणे, विद्यासागर – आधुनिक भारत, सक्सेस प्रकाशन, पुणे २०१३, पृष्ठ ३.४
५) प. न. जोशी -- भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास, स्नेहवर्धन पब्लीकेशन हाउस, पुणे १९९३पृष्ठ ७५